स्थापना : दि. ५ मे २००८
नों.क्र.महा./२४९२९/को./११/०७/०८

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यु.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal )
ISSN No. 2319-6025


# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष-आठवे : अंक सतरा-अठरा । जानेवारी ते जून २०१९

2018-19

## श्रमसंस्कृती आणि साहित्य

दिनांक ९ आणि १० फेब्रुवारी, २०१९



कुणी न राहो दुर्बल अज्ञ । म्हणुनी हा शिक्षण यज्ञ ॥

माजी आमदार श्री. बाबासाहेब पाटील सरुडकर शिक्षण संस्थेचे

## श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरूड

ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

नॅक तृतीय मूल्यांकन : B ग्रेड (CGPA- 2.41)

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal )

ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली, मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष–आठवे : अंक सतरा–अठरा**

जानेवारी-फेब्रुवारी–मार्च, एप्रिल–मे–जून २०१९

## श्रमसंस्कृती आणि साहित्य

संपादक

**डॉ. शिवकुमार सोनाळकर**

कार्यकारी संपादक

**डॉ. नीला जोशी**

संपादक मंडळ

**डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. तातोबा बदामे, डॉ. दिनेश वाघुंबरे**

संपादन सहाय्य

**प्रा. प्रकाश नाईक, प्रा. रघुनाथ मुडळे**

सल्लागार समिती

**डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी**

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६ ०११

**मुद्रक**

भारती मुद्रणालय

८३२ ई वॉर्ड, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५४३२९

मूल्य : रु. ३००/-

# अंतरंग

| | | |
|---|---|---|
| अध्यक्षीय मनोगत... | डॉ. शिवाजी विष्णू पाटील | ८ |
| श्रमसंस्कृती, साहित्य आणि बांधिलकी | डॉ. अनिल गवळी | १३ |
| ग्रामीण कष्टकरी स्त्रीचे चित्रण | एकनाथ पाटील | १८ |
| श्रमसंस्कृती आणि गोमंतकीय मराठी साहित्य | डॉ. विद्या प्रभुदेसाई | २७ |
| श्रमसंस्कृती आणि कोकणी साहित्य | डॉ. महेश स. बावधनकर | ३३ |
| सीमाभागातील श्रमसंस्कृती आणि साहित्य | डॉ.शिवाजीराव पाटील | ४२ |
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण साहित्य | डॉ. यशवंत चव्हाण | ४८ |
| श्रमसंस्कृती आणि भटक्याविमुक्तांचे साहित्य | डॉ. बाळासाहेब संतू चव्हाण | ५३ |
| श्रमसंस्कृती आणि स्त्रीवादी साहित्य | डॉ. लता पांडुरंग मोरे | ६६ |
| श्रमसंस्कृती आणि दलित साहित्य | डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे | ७० |
| श्रमसंस्कृती आणि आदिवासी साहित्य | प्रा. डॉ. दीपककुमार वळवी | ७७ |
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण कष्टकरी स्त्री | डॉ.मानसी जगदाळे | ८१ |
| श्रमसंस्कृती आणि महानगरीय कविता | तेजस चव्हाण | ८७ |
| मधउत्पादक श्रमजीवी | श्री. दत्ता मोरसे | ९३ |
| भारतीय श्रमसंस्कृती आणि मराठी श्रमगीत परंपरा | प्रा. अनंता कस्तुरे | ९७ |
| नोकरी, व्यवसाय, करिअर करणारी स्त्री | प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर | १०७ |
| महादेव मोरे : श्रमिक साहित्याचा आधारस्तंभ | प्रा. डॉ. रमेश पोळ | ११२ |
| खोत व दौंड यांच्या कादंबरीतील शेतकरी | डॉ. एकनाथ आळवेकर | ११६ |
| महादेव मोरेंच्या साहित्यातील विडी कामगार | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील | १२० |
| मराठी स्त्रीगीते आणि श्रमसंस्कृती | डॉ. नीला जोशी | १२३ |
| 'कुळंबीण' : शेतकरी स्त्रीच्या श्रमाचे चित्रण | डॉ. आनंद वारके | १२७ |
| जागतिकीकरण आणि मराठी कादंबरीतील श्रमिक | डॉ. प्रकाश दुकळे | १३० |
| महात्मा बसवण्णांचा श्रमसिद्धांत : 'कायकवे कैलासा' | डॉ. मांतेश हिरेमठ | १३३ |
| मराठी नाटकातील श्रमजीवींचे चित्रण | प्रा. डॉ. दत्ता पाटील | १३७ |
| म. फुले यांच्या साहित्यामधील श्रमिकांचे चित्रण | डॉ. अरुण शिंदे | १४३ |
| नारायण सुर्वे यांच्या कवितेतील कामगारविषयक जाणिवा | डॉ. शिवलिंग मेनकुदळे | १४६ |
| नारायण सुर्वेंच्या कवितेतील कामगार | प्रा. डॉ. शिवाजी महादेव होडगे | १५१ |

| | | |
|---|---|---|
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण कविता | डॉ.अशोक सदाशिव तवर | १५३ |
| शेतकऱ्यांचे लढे आणि ग्रामीण कादंबरी | प्रा. डॉ. सौ. कांचन नलावडे | १६० |
| अनिल अवचट यांच्या साहित्यातील श्रमजीवन | डॉ. सुरेश बाळकृष्ण शिंदे | १६६ |
| धनगर समाजातील श्रमसंस्कृती | डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील | १७० |
| 'आम्ही काबाडाचे धनी'तील कष्टकरी | प्रा. सुभाष वाघमारे | १७३ |
| श्रमसंस्कृती आणि बहिणाईंची गाणी | डॉ. सुवर्णा नामदेव पाटील | १७७ |
| कामगार रंगभूमीवरील श्रमिक | डॉ. आनंद शामराव बल्लाळ | १८१ |
| तथागत बुद्ध आणि श्रमसंस्कृती | डॉ. प्रशांत बाबासो गायकवाड | १८५ |
| सुर्वेंची कविता : श्रमिक जीवनाचा दस्तऐवज | डॉ. अशोक शेलार | १९० |
| दलितांच्या श्रमाचे चित्रण | प्रा. डॉ. नितीश पांडुरंग सावंत | १९३ |
| ग्रामसंस्कृती आणि श्रमसंस्कृती : सहसंबंध | प्रा. डी. जे. दमामे | १९६ |
| जनाबाईंचे अभंग आणि श्रमसंस्कृती | डॉ. धनंजय होनमाने | १९९ |
| मराठी कवितेतील शेतकरी व शेतमजुरांची श्रमसंस्कृती | डॉ. भरत जाधव | २०२ |
| श्रमिक साहित्य आणि साम्यवाद | डॉ. हणमंत रामचंद्र पोळ | २०५ |
| अवैदिकांची श्रमसंस्कृती आणि श्रमप्रतिष्ठा | डॉ. महेश गायकवाड | २०८ |
| अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील श्रमसंस्कृती | डॉ. सविता अशोक व्हटकर | २११ |
| आदिवासी कादंबरीतील भिल्ल जमातीचे श्रमचित्रण | प्रा. विनायक राऊत | २१४ |
| इंद्रजित भालेरावांच्या कवितेतील शेतकरी, शेतमजूर | प्रा.डॉ. सुजय बाबूराव पाटील | २१७ |
| भास्कर चंदनशिव यांच्या साहित्यातील श्रमसंस्कृती | प्रा. राजश्री बिसुरे | २२० |
| महादेव मोरे यांच्या कादंबरीतील श्रमिकांचे चित्रण | डॉ.विनोद राठोड | २२३ |
| नारायण सुर्वे : कामगार साहित्याची 'सनद' | सौ. शीतल सचिन गोर्डे-पाटील | २२६ |
| नारायण सुर्वेंच्या कवितेतील श्रमिकांचा जीवनसंघर्ष | डॉ. अशोक नामदेव शिंदे | २२९ |
| धम्मपाल रत्नाकरांच्या साहित्यातील हॉटेल कामगारांचे चित्रण | डॉ. सर्जेराव पद्माकर | २३२ |
| मराठी कथेतील ग्रामीण, कष्टकरी स्त्रीचे चित्रण | प्रा. संतोषकुमार डफळापूरकर | २३५ |
| 'कविता श्रमाची' मधील श्रमजीवी | प्रा. विठ्ठल नामदेव रोटे | २३८ |
| तू वेडा कुंभार आणि बलुतेदारांची श्रमसंस्कृती | डॉ. सुभाष गणपती जाधव | २४१ |
| आदिवासी साहित्यातील श्रमचित्रण | प्रा. सुलोचना रमेश दंतराव | २४४ |
| १९८० नंतरच्या कादंबरीतील श्रमिकांचे चित्रण | डॉ. माधव मारुती भोसले | २४७ |
| आदिवासींच्या कादंबरीतील श्रमिक | प्रा. भीमराव खंडू वानोळे | २५० |
| 'राघववेळ' व 'अघोरी' कादंबरीतील श्रमसंस्कृती | प्रा. डॉ. आर. डी. कांबळे | २५३ |



ISSN No. 2319-6025

# दलितांच्या श्रमाचे चित्रण

**प्रा. डॉ. नितीश पांडुरंग सावंत**

प्रमुख मराठी विभाग, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

जिच्यासमोर कीर्दसार – वहितीला योग्य जमीन आहे आणि जिच्यामध्ये मातब्बर शेतकरी व पुष्कळसे मजूर आहेत, अशा वस्तीला गाव म्हणतात. गावच्या हद्दीला किंवा सीमेला 'शीव' ही संज्ञा आहे. गावाचे स्वभावतः आणि एकमेकांपासून अलग असे दोन भाग उघड उघड पडतात. एक 'पांढरी' किंवा गावठाण आणि दुसरी 'काळी' किंवा रान काळी किंवा पांढरी. ह्या संज्ञा जमिनीच्या रंग व गुण धर्मावरून आल्या असाव्यात. कोणत्याही गावाला गेले तरी मध्ये पांढरी व सभोवताली काळी दृष्टीस पडेल. गावच्या बंदोबस्तासाठी घाटावरील पुष्कळ गावांसभोवती गावकूस किंवा कोट केले असून त्यातून गावात शिरण्याला एक अगर अधिक वेशी असतात. अस्पृश्य जातींची घरे वेशीच्या आत असतात. आणि मेलेल्या जनावरांची चिरफाड करणाऱ्या वंजारे, वडर, कैकाडी फासेपारधी वगैरेंसारख्या फिरस्त्या व नवीन वस्तीला आलेल्या जंगली जातीची घरे, पाले किंवा झोपड्या प्रायः गावाबाहेर असतात. या सर्व जातीजातींची घरे सलग असतात. त्यांना जातीपरत्वे नावे असतात. उदा. महारवाडा, मांगवाडा, रामोशीवाडा, चांभारवाडा, कोळवाडा, माळआळी, सुतारआळी अशा अनेक जातीजमाती या गावगाड्यांच्या शिल्पकार आहेत. प्रत्येक जातीधर्माची जीवन जगण्याची एक पद्धत आहे, जन्म, लग्न, मृत्यू या वेळी करावयाचे विधी वेगळे आहे. याची श्रमसंस्कृती वेगळी आहे.

गावच्या बारा बलुतेदारांपैकी 'महार' एक महत्त्वाचा बलुतेदार. तो गावात सरकारी गावकीचं काम करतो. गावच्या इतर बलुतेदारांसारखं महाराला पोटापाण्याचा खास असा धंदा, व्यवसाय नाही. महार हा गावचा वतनदार – इनामदार आहे. तो भूमिपुत्र म्हणून मानलेला आहे. पण त्याची वतनी जमीन फारच लहान असते. ''ग्रामीण भागात गावोगावी ज्यांनी प्रथम स्वतःच्या चरितार्थासाठी गाव सोडले त्यात बलुतेदार गावच्या महाराचा पहिला नंबर लागतो. त्याने प्रथम गाव सोडले. त्याचे कारण वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्याला पोटाचा कायमचा असा इतर बलुतेदारांप्रमाणे स्वतंत्र असा कायमचा धंदा, व्यवसाय नाही. हे त्यांचे मूलभूत कारण आहे.''[१] कोणत्याही गावात 'महार' या बलुतेदाराची संख्या गावच्या एकूण लोकसंख्येच्या दहा टक्क्यांपर्यंत असते. पाटील-पटवारी यांची कागदपत्रे तालुक्याच्या गावी कार्यालयात पोहोचविण्याचे काम या खास दूतामार्फत केले जाई. सरकारी कामगारांना आपल्या गावच्या शिवारातील पीक पाहणीस मदत करणे, गावात महत्त्वाच्या घटनांची 'दवंडी' देणे. शिमग्याच्यावेळी गावच्या सामुदायिक 'होळी'साठी गोवऱ्या गोळा करणे, गावसफाई करणे, मृत व्यक्तीचे सरण रचणे, त्याचा निरोप पाहुण्या-रावळ्यांना सांगणे, मेलेली जनावरे ओढणे, लग्नसमारंभ ज्या घरामध्ये आहे तेथे लाकडे फोडणे, वरातीत बत्ती धरणे, गावातून शिळे अन्न मागून खाणे, तराळकी, गावकी करणे, शेतावर सालगडी, गुरेराखणे, विहिरीचा गाळ काढणे, इतर जातीच्या घराच्या लग्नात जानोशावर आंब्याच्या



ISSN No. 2319-6025

पानांचे तोरण बांधणे इत्यादी कामे त्याला करावी लागत. या लग्नाच्या वरातीत बत्ती धरणे या श्रमाच्या मोबदल्यात त्याला फक्त शिळे अन्न, प्रेताच्या अंगावरील कापड-चोपड एवढंच मिळे. आज महार जातीची संभावना अस्पृश्य म्हणून केली जात असली तरी ही जात किंवा सोमवंश सृष्टीच्या निर्मिती इतकी जुनी आहे अशी पुराणकाराची धारणा आहे. मार्कंड ऋषींच्या कृपेने सोमाजी नावाच्या मूळ पुरुषांपासून या वंशाची उत्पत्ती झाली. सूर्य, चंद्र, अग्नी, वायू, आकाशादी या पंचमहाभूतांची निर्मिती सोमवंशाच्या मूळ पुरुषाने केले असे प्रतिपादन पोथीत आहे. विश्वनिर्मितीत महार जातीचे मोठे योगदान असूनही कलियुगात ह्या योगदानाचा विसर पडला आहे. त्यामुळे महारांना हीन, अपवित्र, शूद्र मानून त्यांची अवहेलना केली जात आहे. महार-जागले हे पाटील-कुलकर्ण्यांचे हरकामे शिपाई होते. सरकारी कामानिमित्त ज्या इसमाची त्यांना गरज लागते त्याला बोलावणे, गावात कोणी परका मनुष्य आला, जनन मरण किंवा गुन्हा झाला, काळी-पांढरीतील सरकारी मालमत्ता, झाडे, हद्द, निशाण्या यांचा बिघाड झाला किंवा सरकारी जागेवर कोणी अतिक्रमण केले, तर त्याबद्दलची बातमी पाटील-कुलकर्ण्यांना देणे, गाव स्वच्छ ठेवणे, गस्त घालणे, पाटील-कुलकर्ण्यांबरोबर काळी-पांढरीत व परगावाला सरकारी कामानिमित्त्य जाणे, गावचा वसूल, कागदपत्र व सरकारी सामान ठाण्यात किंवा परगावी पोहोचविणे, पलटणचा बंदोबस्त, सरकारी अंमलदाराची सरबराई, गाड्या धरणे वगैरे कामात पाटील-कुलकर्ण्याला मदत करणे इत्यादी कामे महार-जागल्यांना करावी लागत. त्याचबरोबर ढोरं ओढणं हे महारकीचं मुख्य काम आहे आणि त्याची फाड महार इनामाना व्हावयाची म्हणून महार इनामात हाडकी हाडोळा ही संज्ञा प्राप्त झाली.''[३]

मातंग शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा बलुतेदार समजला जातो. शेतीसाठी नित्य लागणारी दावी, कासरे, मुंगसी, गोफण, नाडा, सौंदर दोऱ्या, सोल, सवंदर, दावण, आसूड, वाकाच्या दोऱ्या वळून देण्याचे काम हा मातंग बलुतेदार करतो. ''देवापुढे 'शहाडा', वाजविणे, सरकारी कामांसाठी माणसांना बोलाविणे, कार्यक्रम प्रसंगी शिंग वाजविणे ही कामे पूर्वी मातंग करीत असत. दररोज 'शहाडा' दिल्याचा मोबदला म्हणून मातंगास दररोज प्रत्येक घरून भाकरी मिळत असे.''[४] विवाह समारंभात नवरदेवाला वेशीत ओवाळण्याचा हक्क मांगिणीचा असे. त्यावेळी खण, नारळ, सुपारी देण्याची रीत होती. मरिआईची पूजा करण्याचा, तेथील नैवेद्य घेण्याचे हक्कदार हे बलुतेदारच आहेत. खेड्यातल्या समारंभाचे वेळी डफ/डफली/ढोल वाजविणे, वाजंत्री वाजविणे, हालगी बँड वाजविणे, झाडू आणि तट्टे बनविणे, रखवालदार-चौकीदार म्हणून काम पाहणे, मांग स्त्रिला अनेक जातीत ''जिथे घरी बाळंतपण होते तिथे मांग स्त्रीला बाळाच्या जन्माच्या वेळी सुईण म्हणून बोलावतात. ती बाळाची नाळ कापते. नंतर ती मांगीण त्या बाळाच्या कानात, तोंडात आणि नाकात फुंकून सर्व मार्ग मोकळे आहेत किंवा नाही हे पाहते.''[५]

सर्व समाजात पवित्र, भद्र मंगल घडावे यासाठी सतत इच्छा बाळगणारा हा समाज शुभ समजला जातो. इतरांची 'इडा पीडा टळो' म्हणून सारी जबाबदारी स्वत:वर घेणारा हा समाज धाडसी आहे. किल्ला उभारणीच्या वेळी विहीर खणण्याच्या शुभंकर कामासाठी मातंगाचा बळी दिला जायचा. असा बळी देणे म्हणजे किल्ला अभेद्य होतो आणि विहिरीला पाणी अधिक लागते असा समज होता. मकर संक्रांतीला सवाष्ण मातंग स्त्रीला वाण देणे आणि


ISSN No. 2319-6025

सकाळी उठल्यावर मातंगाचे मुख पाहायला मिळणे हे शुभ समजले जाते. या सगळ्या कुप्रथा मातंगाचा अहंकार वाढविणाऱ्या आणि अधिक शोषणातून गुलामीकडे नेणाऱ्या आहेत. "ब्रिटिशांच्या काळापासून गुन्हेगाराला फासावर चढविण्यासाठी मांगाचीच नेमणूक असते."[६]

महाराष्ट्राच्या मराठी भूमीत प्रांतानुसार आणि बोलीभाषेनुसार जरी भेद असले तरी "मातंगाविषयक समज, अपसमज, तुच्छतादर्शक, पूर्वग्रहदूषित, पारंपरिक दृष्टिकोन मात्र सर्वच सारखाच आढळून येतो."[७] एकंदरीत मातंग समाजाविषयी म्हणी, वाक्प्रचार पुढीलप्रमाणे आढळतात. 'गाव तिथं गढी अन गढी तिथं मांगाला गाढी', 'भेटला मांग फिटला पांग', 'एक मांग साऱ्या गावाला टांग', 'मांग तर मांग भलतीच खबर सांग', 'मांग खातो डल्ल्या अन फिरतो गल्ल्या', 'मांगाच लेकरू आणि सुखाचं पाखरू', 'मांगाला नाही मान असते फक्त काम', 'मांग माजला अन् दिवा लावून निजला', 'मांग म्हणजे भीक माग', 'मांगाचा विटाळ खेत्री विटाळ', 'मांग म्हणजे राग आणि राग म्हणजे भीक माग' अशा प्रकारे मांगाविषयीचे म्हणून अनेक वाक्प्रचार व्यवहार आढळतात.

**सारांश**

१९२७ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बलुतेदारी आणि वतने नष्ट करण्याची भूमिका मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेमुळे मुंबई प्रांताच्या शासनाने १९५८ साली वतने नष्ट करण्याचा कायदा पास करण्यात आला. या बलुतेदारांनी अति सोसले, त्यांना समाजानेही खूप छळले, खूप अन्याय केला. त्याचाच परिणाम म्हणून डॉ. आंबेडकरांनी या साऱ्या व्यवस्थेविरुद्ध यशस्वी लढा दिला. परिवर्तन आले, लोकांनी ही व्यवस्था सोडली.

**संदर्भ**

१) गावचे अलुतेदार आणि बलुतेदार - शंकरराव खरात प्रकाशन- इंद्रायणी साहित्य, पुणे, दु. आ २०१४, पृष्ठ क्र.०९

२) महाराष्ट्र साहित्यपत्रिका - ऑक्टो. ते डिसें. २०१८, पृष्ठ क्र. २९

३) गाव-गाडा - त्रिंबक नारायण अत्रे, वरद प्रकाशन, पुणे, ३ रे पुनर्मुद्रण, जून २००९, पृष्ठ १०३

४) गावगाड्याचे शिल्पकार - डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर स्वरुप प्रकाशन औरंगाबाद प्र. आ. २००९ पृष्ठ ७२

५) महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती डॉ. एस. जी. देवगांवकर श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर प्र. आ डिसें.२००९ पृष्ठ ३१५

६) महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती डॉ. एस. जी. देवगांवकर श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर प्र. आ डिसें.२००९ पृष्ठ ३१५

७) मातंग समाज : साहित्य आणि संस्कृती - शरद गायकवाड स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे प्र. आ. जून २००५ पृ. ६५

◆